महानगरपालिका, जिल्हापरिषद / पंचायत समित्या सार्वत्रिक निवडणुका-२०१७
उमेदवाराने निवडणुकांमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित करण्याबाबत......

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : ३१ जानेवारी, २०१७

## आदेश

क्रमांक रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.४६/का.५ ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील महानगरपालिका, जिल्हापरिषदा / पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१७/का.५, दि. ३० जुलै, २०११ अन्वये महानगरपालिका, जिल्हापरिषद, पंचायत समित्या, नगरपरिषदा / नगरपंचायती व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांकरिता उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे.

३. आणि ज्याअर्थी; सदर मर्यादा पुरेशी नसल्यामुळे आगामी महानगरपालिका, जिल्हापरिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने सुधारित करणे आवश्यक आहे.

४. आणि त्याअर्थी; भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८अ(४), महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियम, १९४९ च्या कलम १४(४), महाराष्ट्र जिल्हापरिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम ९अ अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महानगरपालिका, जिल्हापरिषद / पंचायत समित्या निवडणुकांकरिता उमेदवाराने करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | सुधारीत मर्यादा | |
|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका | रुपये १०,००,०००/- | |
| २ | महानगरपालिका - सदस्य संख्या १६१ ते १७५ | रुपये १०,००,०००/- | |
| ३ | महानगरपालिका - सदस्य संख्या १५१ ते १६० | रुपये १०,००,०००/- | |
| ४ | महानगरपालिका - सदस्य संख्या ११६ ते १५० | रुपये ८,००,०००/- | |
| ५ | महानगरपालिका - सदस्य संख्या ८६ ते ११५ | रुपये ७,००,०००/- | |
| ६ | महानगरपालिका - सदस्य संख्या ६५ ते ८५ | रुपये ५,००,०००/- | |
| | | सुधारीत मर्यादा | |
| | जिल्हापरिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्या | जिल्हपरिषदेकरिता | पंचायत समितीकरिता |
| १ | ७१ ते ७५ निवडणूक विभाग असलेले जिल्हे | रु. ६,००,०००/- | रु. ४,००,०००/- |
| २ | ६१ ते ७० निवडणूक विभाग असलेले जिल्हे | रु. ५,००,०००/- | रु. ३,५०,०००/- |
| ३ | ५० ते ६० निवडणूक विभाग असलेले जिल्हे | रु. ४,००,०००/- | रु. ३,००,०००/- |

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त.
२) सर्व महानगरपालिका आयुक्त.
३) सर्व जिल्हाधिकारी.
४) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने.
५) मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक.
६) सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
७) निवड नस्ती.